# सहायक मोटार वाहन निरीक्षक परीक्षा

**१. संवर्ग व पदे याबाबतचा संक्षिप्त तपशील:-**

**१.१** राज्य शासनाच्या परिवहन विभागाच्या अखत्यारीतील सहायक मोटार वाहन निरीक्षक, गट-क संवर्गातील पदे शासनाच्या मागणीनुसार व पदांच्या उपलब्धतेनुसार सदर परीक्षेमधून भरण्यात येतात.

**१.२ पदांचा तपशील:-**

**१.२.१** संवर्ग-अराजपत्रित, गट-क

**१.२.२** नियुक्तीचे ठिकाण - महाराष्ट्रात कोठेही

**१.२.३** वेतन मॅट्रिक्समधील वेतन स्तर:- एस-१४:रु. ३८६००-१२२८०० अधिक महागाई भत्ता व नियमानुसार देय इतर भत्ते.

**१.२.४** उच्च पदावर बढतीची संधी-ज्येष्ठता व पात्रतेनुसार परिवहन विभागातील मोटार वाहन निरीक्षक व त्यापुढील संवर्ग.

**१.३** शासनाच्या मागणीनुसार भरावयाच्या पदांचा तपशील, पदसंख्या, आरक्षण, अर्हता, इत्यादी बाबीं जाहिरात / अधिसूचनेद्वारे उमेदवारांना उपलब्ध करून देण्यात येईल.

**२. परीक्षेचे टप्पे:-**

**२.१** प्रस्तुत परीक्षा खालील दोन टप्प्यात घेण्यात येते:-

| **(एक)** पूर्व परीक्षा | **(दोन)** मुख्य परीक्षा |
|---|---|
| १०० गुण | ३०० गुण |

**२.२** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी उमेदवारांची संख्या विहित मर्यादेत सिमित करण्यासाठी पूर्व परीक्षा घेण्यात येते. पूर्व परीक्षेसाठी आयोगाने विहित केलेल्या किमान सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांस मुख्य परीक्षेसाठी पात्र समजण्यात येते.

**२.३** पूर्व परीक्षेचे गुण अंतिम निवडीच्या वेळी विचारात घेतले जाणार नाहीत. तसेच, पूर्व परीक्षेचे गुण उमेदवारांना कळविले जात नाहीत.

**३. पात्रता:-**

**३.१** भारतीय नागरिकत्व

**३.२ वयोमर्यादा:-**

| वय गणण्याचा दिनांक | किमान वय | कमाल वय | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | सर्वसाधारण व महिला | | प्राविण्य प्राप्त खेळाडू | | माजी सैनिक | |
| | | अमागास | मागासवर्गीय/ अनाथ | अमागास | मागासवर्गीय / अनाथ | अमागास | मागासवर्गीय / अनाथ |
| जाहिरातीमध्ये नमूद दिनांक | १९ | ३८ | ४३ | ४३ | ४३ | ४३ +सेवा कालावधी+३ वर्ष | ४३ +सेवा कालावधी+३ वर्ष |

**३.३** विहित वयोमर्यादा इतर कोणत्याही बाबतीत शिथिल केली जाणार नाही.

**३.४ शैक्षणिक अर्हता:-**

**३.४.१** महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाची माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा (एस.एस.सी.) किंवा महाराष्ट्र शासनाने एस.एस.सी. च्या समतुल्य म्हणून घोषित केलेली अर्हता, आणि

**३.४.२** माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील किमान ३ वर्षाची पदविका वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेली अर्हता.

**३.४.३** स्वयंचल अभियांत्रिकी (Automobile Engineering) वा यंत्र अभियांत्रिकी (Mechanical Engineering) विषयातील मान्यता प्राप्त विदयापीठाची पदवी किंवा त्यापेक्षा अत्युच्च अर्हता धारण केलेले वा केंद्र वा राज्य शासनाने त्यास समकक्ष म्हणून घोषित केलेल्या अर्हता धारण केलेले उमेदवार देखील पात्र राहतील.

**३.४.४** खालील अर्हता समतुल्य शैक्षणिक अर्हता म्हणून स्वीकारार्ह आहेत:-

| अ.क्र. | संदर्भ | अर्हता |
|---|---|---|
| १ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक २३ जानेवारी, २०१७ | (१) डिप्लोमा इन प्रॉडक्शन टेक्नॉलॉजी<br>(२) डिप्लोमा इन प्रॉडक्शन इंजिनिअरिंग<br>(३)डिप्लोमा इन मशिन टूल्स मेन्टेनन्स<br>(४)डिप्लोमा इन फॅब्रिकेशन टेक्नॉलॉजी<br>(५)डिप्लोमा इन फॅब्रिकेशन अँड इरेक्शन इंजिनिअरिंग<br>(६)डिप्लोमा इन प्लॅन्ट इंजिनिअरिंग |

| | | |
|---|---|---|
| | | (७) डिप्लोमा इन मेटॅलर्जी<br>(८) बॅचलर डिग्री इन मेकॅनिकल इंजिनिअरींग<br>(९) बॅचलर डिग्री इन अॅटोमोबाईल इंजिनिअरींग<br>(१०) बॅचलर डिग्री इन प्रॉडक्शन इंजिनिअरींग<br>(११) बॅचलर डिग्री इन इंडस्ट्रिअल इंजिनिअरींग |
| २ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १५ फेब्रुवारी, २०१७ | डिप्लोमा इन मेकॅट्रॉनिक्स इंजिनिअरिंग |
| ३ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १६ फेब्रुवारी, २०१७ | डिप्लोमा इन पॅकेजिंग टेक्नॉलॉजी |
| ४ | शासन पत्र, गृह विभाग, क्रमांक: एमव्हीडी-१२१६/प्र.क्र.-३०१/परि-३, दिनांक १८ फेब्रुवारी, २०१७ | 4 Years Theoretical and Practical Training as an Artificer Apprentice. |

**३.४.५** उपरोक्त नमूद पदवी/पदविकांव्यतिरिक्त इतर पदवी/पदविकांच्या समतुल्यतेबाबत प्रश्न उपस्थित झाल्यास यथास्थिती केंद्र शासनाचा अथवा राज्य शासनाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**३.४.६** पदवी परीक्षेस बसलेले उमेदवार प्रस्तुत पूर्व परीक्षेस तात्पुरते पात्र असतील. परंतु मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरणा-या उमेदवारांनी मुख्य परीक्षेकरीता अर्ज स्वीकारण्यासाठी विहित केलेल्या अंतिम दिनांकापर्यंत पदवी परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**३.४.७** अंतर्वासिता (Internship)किंवा कार्यशाळेतील कामाचा अनुभव आवश्यक असेल अशा पदवी धारण करणा-या उमेदवारांनी सदर अट मुख्य परीक्षेचा अर्ज स्वीकारण्याच्या अंतिम दिनांकापर्यंत पूर्ण केली असेल तरच त्यांना पदवीधर समजण्यात येईल.

**३.४.८** मराठी लिहिणे, वाचणे, बोलता येणे अत्यावश्यक आहे.

**३.५ अनुभव:-**

**३.५.१** स्वयंचल अभियांत्रिकी वा यंत्र अभियांत्रिकी मधील पदविका/पदवी/अत्युच्च अर्हता अथवा वरीलप्रमाणे समकक्ष अर्हता धारण केल्यानंतर मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास हलकी मोटार वाहने, जड मालवाहू वाहने व जड प्रवासी वाहने यांचे दुरुस्ती व देखभाल करण्याचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून केंद्र अथवा राज्य शासनाच्या विभागामध्ये वा अंगीकृत व्यवसायांचे अखत्यारीतील यंत्रशाळांमध्ये घेतलेला अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये घेतलेला किमान एक वर्ष कालावधीचा अनुभव आवश्यक.

**३.५.२** अनुभवाच्या प्रयोजनार्थ प्रशिक्षणार्थी अथवा अॅप्रेंटिस म्हणून वरील ठिकाणी घेतलेला अनुभव गृहित धरला जाऊ शकेल.

**३.५.३** मुख्य परीक्षेस अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे किमान एक वर्ष कालावधीचा पूर्ण वेळ कर्मचारी म्हणून अनुभव नसेल त्यांनी नियुक्तीनंतर परिविक्षाधीन कालावधीमध्ये शासनाच्या विभागात अथवा अंगीकृत व्यवसायामध्ये अथवा शासन वेळोवेळी निर्देशित करेल अशा संस्थांमध्ये किमान १ वर्ष कालावधीचा अनुभव घेणे बंधनकारक राहील.

**३.६ वैध अनुज्ञप्ती (License):-**

**३.६.१** मुख्य परीक्षेकरीता अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वैध असणारी गिअर्स असलेली मोटार सायकल, हलके मोटार वाहन आणि परिवहन वाहन (जड मालवाहू वाहन आणि जड प्रवासी वाहन) या संवर्गासाठी सक्षम प्राधिका-याने दिलेली वैध अनुज्ञप्ती (Licence) आवश्यक.

**३.६.२** अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकास वर नमूद केल्याप्रमाणे जड माल वाहतूक वाहन किंवा जड प्रवासी वाहतूक वाहन यापैकी एखादी किंवा दोन्ही वाहने चालविण्याची अनुज्ञप्ती (Licence) नसेल तर अशा उमेदवारास अशी अनुज्ञप्ती, नियुक्ती नंतरच्या दोन वर्षाच्या परिवीक्षा कालावधीमध्ये प्राप्त करणे बंधनकारक असेल.

**३.६.३** परिविक्षा कालावधीमध्ये अशी अनुज्ञप्ती प्राप्त न करणा-या उमेदवारास सेवेतून कमी करण्यात येईल.

**३.६.४** वाहन चालविण्याची अनुज्ञप्ती वेळोवेळी नूतनीकरण केली असली पाहिजे आणि

**३.७ शारीरिक अर्हता:-**

**३.७.१** शारीरिक अर्हता खालीलप्रमाणे आवश्यक:-

| पुरुष उमेदवार | महिला उमेदवार |
|---|---|
| **(१) उंची-** १६३ सें. मी. (अनवाणी) (कमीत कमी)<br>**(२) छाती-** किमान ७९ से.मी. प्रसरणाशिवाय व किमान ५ से.मी. प्रसरण | **(१) उंची-** १५५ सें.मी. (अनवाणी) (कमीत कमी )<br>**(२) वजन-** ४५ कि. ग्रॅ. (कमीत कमी ) |

३.७.२ जे रंगांध नसून, ज्यांची दृष्टी चष्म्यासह वा शिवाय चांगली आहे.

३.७.३ शासन निर्णय, गृह (परिवहन) विभाग, क्रमांक एमव्हीडी-१२०३/प्र.क्र.३७२/परि-४, दिनांक ८ ऑगस्ट, २००८ नुसार दिव्यांग उमेदवार सदर पदासाठी पात्र नाहीत.

**४.शुल्क (फी):-**

४.१ प्रस्तुत परीक्षेकरीता आयोगाकडून आकारण्यात येणारे शुल्क खालीलप्रमाणे आहे:-

| अ.क्र. | परीक्षेचे नांव | परीक्षा शुल्क | | |
|---|---|---|---|---|
| | | अमागास | मागासवर्गीय/अनाथ | माजी सैनिक |
| (१) | पूर्व परीक्षा | ₹ ३७४ | ₹ २७४ | ₹ २४ |
| (२) | मुख्य परीक्षा | ₹ ५२४ | ₹ ३२४ | ₹ २४ |

४.२ विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), विशेष मागास प्रवर्ग, भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), इतर मागास वर्ग तसेच सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उन्नत व प्रगत गटात (क्रिमी लेयर) मोडणाऱ्या उमेदवारांनी त्यांना आरक्षणाचा व वयोमर्यादेचा फायदा देय नसल्याने त्यांनी अमागास उमेदवारांप्रमाणे परीक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

४.३ उन्नत व प्रगत गटासंदर्भातील (क्रिमी लेयर) उत्पन्नाची मर्यादा तसेच अन्य तद्अनुषंगिक बाबी शासनाने वेळोवेळी जारी केलेल्या आदेशानुसार राहतील.

**५. पूर्व परीक्षा:-**

**५.१ परीक्षा योजना:-**

**(१) एकूण गुण:- १००**

**(२) प्रश्नपत्रिका:-** एक. प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे :-

| विषय | संकेतांक | दर्जा | माध्यम | प्रश्नसंख्या | गुण | कालावधी | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| सामान्य अध्ययन व बुध्दिमापन चाचणी | ०४ | माध्यमिक शालांत परीक्षेसमान | मराठी व इंग्रजी | १०० | १०० | एक तास | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |
| यंत्र अभियांत्रिकी व स्वयंचल अभियांत्रिकी संबंधित चालू घडामोडी | | पदविकेसमान | | | | | |

**५.२ अभ्यासक्रम:-** सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे:-

| अ. क्र. | विषय |
|---|---|
| (१) | **सामान्य अध्ययन**<br>चालू घडामोडी, सामाजिक व औदयोगिक सुधारणा, सामान्य विज्ञान, भारताचा सामान्य इतिहास व भूगोल (महाराष्ट्राच्या विशेष अभ्यासासह), नागरिकशास्त्र. |
| (२) | **बुध्दिमापन चाचणी**<br>उमेदवार किती लवकर व अचूकपणे विचार करु शकतो, याचा अंदाज घेण्याच्या दृष्टीने सदर चाचणीमध्ये प्रश्न विचारण्यात येतील. |
| (३) | **यंत्र अभियांत्रिकी व स्वयंचल अभियांत्रिकी संबंधित चालू घडामोडी**<br>Latest trends and technological development in the field of Mechanical and Automobile Engineering. |

**५.३ परीक्षा केंद्र:-**

५.३.१ खालील ठिकाणी सदर परीक्षा घेण्यात येईल:-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक | | केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|---|
| औरंगाबाद | **१५** | | नागपूर | **३२** |
| मुंबई | **३०** | | पुणे | **३८** |

५.३.२ उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र ऑनलाईन पद्धतीने अर्ज सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

५.३.३ उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार वेळोवेळी वाढ अथवा बदल होऊ शकतात.

५.३.४ विहित पध्दतीने ऑनलाईन माहिती सादर करताना उमेदवारांने निवडलेले जिल्हाकेंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध परीक्षा उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**५.३.५** एखादे जिल्हा केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही अथवा एखाद्या जिल्हा केंद्रांवर उमेदवारांना प्रवेश देण्याची क्षमता ओलांडली गेली तर ते जिल्हाकेंद्र निवडलेल्या उमेदवारांची बैठक व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**५.३.६** एकदा निवडलेल्या जिल्हा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या परीक्षा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही कारणास्तव मान्य करण्यात येणार नाही.

**५.३.७** वरीलप्रमाणे जिल्हा केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**५.४ पूर्व परीक्षेचा निकाल:-**

**५.४.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**५.४.२ उमेदवाराने एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा जास्त उत्तरे दिली असल्यास, सदर प्रश्नाचे उत्तर चुकले असल्याचे समजून वरील परिच्छेद क्रमांक ५.४.१ मधील तरतुदीनुसार गुण वजा करण्यात येतील.**

**५.४.३** भरावयाच्या एकूण पदांच्या सुमारे १२ पट उमेदवार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र होतील, अशा रीतीने प्रथम टप्प्यात गुणांची सीमारेषा (Cut Off Line) निश्चित करण्यात येईल. तद्नंतर, दुस-या टप्प्यात प्रत्येक प्रवर्गातील पदांसाठी १२ पट उमेदवार उपलब्ध होण्याची निश्चिती करण्यासाठी जरुरीप्रमाणे सीमारेषा खाली ओढली जाईल. तथापि, अशा पध्दतीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी दुस-या टप्प्यात पात्र ठरलेले अतिरिक्त उमेदवार केवळ त्यांच्या राखीव प्रवर्गासाठीच्या पदावरच निवडीसाठी पात्र असतील

**५.४.४** केवळ सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांच्या सीमारेषेच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी अंतिम निवडीच्या वेळी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाईल. सर्वसाधारण (अमागास) उमेदवारांसाठी असलेली सीमारेषा शिथिल करुन मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेले उमेदवार अंतिम शिफारशीच्या वेळी फक्त संबंधित आरक्षित पदासाठी पात्र ठरतील.

**५.४.५** प्रत्येक प्रवर्ग/उपप्रवर्गासाठी आयोगाने निश्चित केलेल्या सीमारेषा किंवा त्यापेक्षा जास्त गुण मिळविणा-या उमेदवारांना त्यांनी पूर्व परीक्षेच्या अर्जामध्ये दिलेल्या माहितीच्या आधारे, ते विहित अटींची पूर्तता करतात असे समजून निव्वळ तात्पुरत्या स्वरूपात मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**५.४.६** अशा रितीने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**५.४.७** मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचा निकाल व निकाल जाहीर झाल्याची घोषणा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच, मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या प्रत्येक उमेदवाराला आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एसएमएसद्वारे वैयक्तिकरीत्या कळविण्यात येईल. तथापि, वैयक्तिकरित्या एसएमएसद्वारे कळविण्याची सुविधा ही अतिरिक्त सुविधा असून आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल हाच अधिकृत मानण्यात येईल. तसेच, संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेला निकाल कोणत्याही अभिवेदन अथवा दाव्यांकरीता ग्राह्य धरण्यात येईल.

**५.४.८** पूर्व परीक्षा ही मुख्य परीक्षेच्या प्रवेशाकरिता उमेदवारांची संख्या मर्यादित करण्याच्या दृष्टिने घेण्यात येणारी चाळणी परीक्षा असल्याने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र न ठरलेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची फेरतपासणी केली जात नाही अथवा यासंदर्भातील कोणत्याही प्रकारच्या अभिवेदनावर कार्यवाही केली जात नाही.

**६. मुख्य परीक्षा:-**

**६.१ परीक्षेस प्रवेश:-**

**६.१.१** पूर्व परीक्षेकरीता विहित केलेल्या मर्यादेनुसार मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या आणि आवश्यक शैक्षणिक अर्हता व अन्य अटींची पूर्तता करणा-या उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येईल.

**६.१.२** मुख्य परीक्षेकरीता आयोगाच्या कार्यालयाकडून अधिसूचना निर्गमित झाल्यानंतर आयोगाच्या ऑनलाईन अर्ज प्रणालीच्या संकेतस्थळाद्वारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र उमेदवारांना त्यांच्या प्रोफाईलद्वारे अर्ज करता येईल. त्यावेळी मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पद्धतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क विहित मुदतीत सादर करणे आवश्यक राहील.त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही.

**६.१.३** पूर्व परीक्षेकरीता अर्ज सादर करताना आयोगाकडे सादर केलेल्या कोणत्याही दाव्यामध्ये नंतर कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही.

**६.२ परीक्षा योजना:-**

**६.२.१ परीक्षेचे टप्पे:-एक.** लेखी परीक्षा- ३०० गुण

६.२.२ **प्रश्नपत्रिका-एक.** प्रश्नपत्रिकेचा तपशील खालीलप्रमाणे आहे:-

| विषय | संकेतांक | दर्जा | कालावधी | प्रश्नसंख्या | गुण | माध्यम | प्रश्नपत्रिकेचे स्वरुप |
|---|---|---|---|---|---|---|---|
| यंत्र अभियांत्रिकी व स्वयंचल अभियांत्रिकी | २४ | संबंधित विषयाच्या पदविकेसमान | दिड तास | १५० | ३०० | फक्त इंग्रजी | वस्तुनिष्ठ बहुपर्यायी |

६.२.३ मुख्य परीक्षेच्या 'यंत्र अभियांत्रिकी व स्वयंचल अभियांत्रिकी' या विषयाच्या प्रश्नपत्रिकेतील **Section 'A'** मधील प्रश्न **अनिवार्य** असतील. मात्र **Section 'B'** किंवा **Section 'C'** यापैकी एकाच Section मधील प्रश्न उमेदवारांनी सोडवायचे आहेत.

६.२.४ **अभ्यासक्रम:**- सविस्तर अभ्यासक्रम खालीलप्रमाणे:-

| **Section A: Mechanical and Automobile Engineering - (120 Questions and 240 Marks)** | |
|---|---|
| (१) | **Strength of Materials:-** Stress and strain, strain energy, shearing force and bending moment, moment of inertia, Principal planes and stresses, slope and deflection, Direct and bending stresses, Columns, Torsion and thin cylinders. |
| (२) | **Mechanical Technology:** Engineering materials, Non chip forming processes, chip Forming process : Turning, Drilling, Milling, Boring, Broaching, Finishing and super finishing, Gear production as well as NC-CNC and non conventional machining methods. |
| (३) | **Theory of Machines:** Kinematics and dynamics of machines, role of friction, different power devices and power transmission equipments such as governers, gyroscopes etc, Applications of cams. |
| (४) | **Hydraulics:** Fluids and their properties, Laminar and turbulent flow, Bernaulli's Equation, Fluid pressure, Pascal'S Law, Surface tention, fluid flow and its measurement. |
| (५) | **Thermal Engineering:** Sources of energy: Conventional and non conventional, Laws of thermodynamics, Principle and working of heat engines, air compressors. Air Standard, vapour power and Gas power cycles. |
| (६) | **A. Automobile Engines:** Theory, working and constructional features of C.I. and S.I. engines, Combustion phenomena and various ignition systems, Fuels and Lubricants, Performance and Testing of I.C. Engines, Pollution control. |
| | **B. Industrial Electronics:** Diods, UJT, BJT, amplifiers, microprocessors. |

| **Section B: Mechanical Engineering - (30 Questions and 60 Marks)** | |
|---|---|
| (१) | **Hydraulic Machinary:** Imapact of jet, Hydraulic turbines, Hydraulic pumps: Centrifugal, reciptrocating and other types, Hydraulic control circuits. |
| (२) | **Refrigeration and Air Conditioning:** Refrigerator and heat pump, Vapour compression and vapour absorption refrigeration systems, Refrigerants, Psychrometry, Air conditioning and its applications. |
| (३) | **Industrial Engineering:** Types of production, plant layouts, process planning, work study, statistical quality control, Metrology |

**OR**

| **Section C: Automobile Engineering-(30 Questions and 60 Marks)** | |
|---|---|
| (१) | **Automobile Systems:** Vehicle layout, Transmission system, breaking systems, ABS, Steering and suspension system, Chasis Frame and Body engineering. |

| (२) | **Vehicle Maintenance:**<br>Performance of vehicles, engine electricals and electronics, workshop layout, repairing and servicing, Emission measurements and control techniques. |
|---|---|
| (३) | **Transport Management :**<br>Elements of transport and its operations, Motor Vehicle Act, Taxation, Insurance. |

**६.३ परीक्षा केंद्र:-**

**६.३.१** खालील चार ठिकाणी सदर मुख्य परीक्षा घेण्यात येईल :-

| केंद्र | केंद्राचा सांकेतांक | केंद्र | केंद्राचा सांकेतांक |
|---|---|---|---|
| औरंगाबाद | **१५** | नागपूर | **३२** |
| मुंबई | **३०** | पुणे | **३८** |

**६.३.२** मुख्य परीक्षा वर नमूद केलेल्या जिल्हाकेंद्रावर अथवा फक्त मुंबई येथे घेण्याबाबतचा निर्णय मुख्य परीक्षेच्या अधिसूचनेद्वारे उमेदवारांना अवगत करण्यात येईल.

**६.३.३** परीक्षा वर नमूद केल्याप्रमाणे चार ठिकाणी घ्यावयाचा निर्णय झाल्यास उपरोक्त जिल्हा केंद्रांमधून कोणतेही एक केंद्र मुख्य परीक्षेकरीता माहिती सादर करताना निवडणे आवश्यक आहे.

**६.३.४** उपरोक्त जिल्हा केंद्रांमध्ये आवश्यकतेनुसार बदल होऊ शकतो.

**६.३.५** विहित पद्धतीने अर्ज/माहिती सादर करताना उमेदवाराने निवडलेले जिल्हा केंद्र व उपलब्धतेनुसार जिल्हा केंद्रावरील विविध उपकेंद्रावर पात्र उमेदवारांना प्रवेश देण्यात येईल.

**६.३.६** वर नमूद चार जिल्हाकेंद्रापैकी एखादे केंद्र कार्यान्वित होऊ शकले नाही तर त्या केंद्रावरील उमेदवारांची व्यवस्था जवळच्या दुस-या जिल्हा केंद्रावर करण्यात येईल.

**६.३.७** एकदा निवडलेल्या परीक्षा केंद्रामध्ये अथवा आयोगाने निश्चित केलेल्या केंद्र अथवा उपकेंद्रामध्ये बदल करण्याची विनंती कोणत्याही परिस्थितीत मान्य करण्यात येणार नाही.

**६.३.८** वरीलप्रमाणे केंद्रनिवडीची प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवाराने अर्जामध्ये दिलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यामधील नमूद जिल्हाकेंद्रावर किंवा नजिकच्या जिल्हाकेंद्रावर प्रवेश देण्यात येईल. याबाबत आयोगाचे त्या त्या वेळचे धोरण व आयोगाचा निर्णय अंतिम मानण्यात येईल.

**६.४ लेखी परीक्षेचा निकाल:-**

**६.४.१** वस्तुनिष्ठ स्वरुपांच्या उत्तरपत्रिकांचे मुल्यांकन करताना उत्तरपत्रिकेत नमूद केलेल्या योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच प्रत्येक चार चुकीच्या उत्तरामागे एका प्रश्नाचे गुण एकूण गुणांमधून वजा करण्यात येतील.

**६.४.२ उमेदवाराने एखाद्या प्रश्नाची एकापेक्षा जास्त उत्तरे दिली असल्यास, सदर प्रश्नाचे उत्तर चुकले असल्याचे समजून वरील परिच्छेद क्रमांक ६.४.१ मधील तरतुदीनुसार गुण वजा करण्यात येतील.**

**६.४.३** मुख्य लेखी परीक्षेमध्ये प्राप्त केलेल्या गुणांची एकत्रित बेरीज करुन गुणवत्ताक्रमानुसार यादी तयार करण्यात येईल. सदर गुणवत्ता यादीमधील समान गुण धारण करणा-या उमेदवारांचा प्राधान्यक्रम (Ranking) "**उमेदवारांना सर्वसाधारण सूचना**" मध्ये नमूद केलेल्या निकषानुसार ठरविण्यात येईल.

**६.४.४** अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक तसेच उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमी लेयर) प्रमाणपत्र असलेल्या विमुक्त जाती (अ), भटक्या जमाती (ब), भटक्या जमाती (क), भटक्या जमाती (ड), विशेष मागास प्रवर्ग, इतर मागास वर्ग, सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास प्रवर्ग या प्रवर्गातील उमेदवार तसेच महिला, अनाथ, माजी सैनिक व पात्र खेळाडू उमेदवार लेखी परीक्षेत केवळ त्यांच्यासाठी विहित केलेल्या निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त झाल्यास अंतिम शिफारशींच्या वेळी त्यांची उमेदवारी केवळ त्या त्या संबंधित प्रवर्गासाठी विचारात घेतली जाईल. निम्न सीमारेषेनुसार अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांची उमेदवारी सर्वसाधारण (अमागास) पदासाठी विचारात घेतली जाणार नाही.

**७. शिफारस:-**

**७.१** "उमेदवारांना सर्वसाधारण सूचना"मध्ये नमूद केलेल्या कार्यपद्धतीनुसार उमेदवारांच्या निवडी विषयीच्या शिफारसी शासनाच्या संबंधित विभागाकडे पाठविण्यात येतील.

**७.२** परीक्षेस उपस्थित राहिलेल्या उमेदवारांना शिफारसीनंतर त्यांची नियुक्तीसाठी शासनाकडे शिफारस करण्यात आली आहे किंवा नाही, ते प्रोफाईलद्वारे कळविण्यात येईल. तसेच, शिफारस झालेल्या उमेदवारांची नावे आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येतील.

**७.३** लेखी परीक्षेमधून शिफारशीसाठी पात्र होण्याकरिता शतमत (Percentile) पध्दत लागू आहे. प्रस्तुत मुख्य परीक्षेमध्ये सर्वाधिक गुण मिळविणा-या उमेदवाराच्या एकूण गुणांच्या खालीलप्रमाणे किमान गुण प्राप्त करणारे उमेदवार शिफारशीसाठी पात्र असतील:-

(१) अमागास- किमान ३५ शतमत

(२) मागासवर्गीय- किमान ३० शतमत
(३) अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू- किमान २० शतमत
(४) माजी सैनिक- किमान २० शतमत

**७.४** अनाथ अथवा अत्युच्च गुणवत्ताधारक पात्र खेळाडू अथवा माजी सैनिक या प्रवर्गाच्या किमान सीमारेषेच्या आधारे शिफारशीसाठी पात्र ठरणा-या उमेदवारास कोणतीही एक सवलत घेता येईल.

**८. शारीरिक क्षमता व प्रमाणपत्र पडताळणी:-**

**८.१** प्रस्तुत परीक्षेच्या अंतिम निकालाच्या आधारे शिफारस झालेल्या उमेदवारांची शारीरिक क्षमतेबाबतची मोजमापे नियुक्ती करण्यापूर्वी शासनामार्फत सक्षम प्राधिका-याकडून तपासून घेण्यात येतील. अर्जातील दाव्यानुसार विहित शारीरिक क्षमता नसल्यास संबंधित उमेदवार नियुक्तीसाठी अपात्र ठरेल.

**८.२** आयोगाने निश्चित केलेल्या किमान सीमारेषेनुसार शिफारसपात्र ठरलेल्या उमेदवारांची पात्रता जाहिरात / शासन परिपत्रकातील अर्हता / अटी व शर्तीनुसार मूळ कागदपत्राच्या आधारे सक्षम प्राधिका-यांकडून तपासली जाईल.

**८.३** अर्जातील दाव्यानुसार मूळ कागदपत्र सादर करणा-या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी केली जाईल.

**८.४** वरीलप्रमाणे लेखी परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस पात्र ठरलेल्या उमेदवारांची प्रमाणपत्र पडताळणी सक्षम प्राधिका-यांकडून निश्चित करण्यात आलेल्या कार्यक्रमानुसार तसेच सक्षम प्राधिका-याने निश्चित केलेल्या ठिकाणी व विहित वेळेस घेण्यात येतील. त्याकरीता उमेदवारास स्वखर्चाने उपस्थित रहावे लागेल.

**८.५** अर्जातील दाव्यानुसार सक्षम प्राधिका-याकडून करण्यात आलेल्या शारीरिक क्षमता तपासणीच्या तसेच प्रमाणपत्र पडताळणीच्या आधारे पात्र ठरलेल्या उमेदवारांनाच नियुक्ती देण्याची कार्यवाही सक्षम प्राधिका-यांकडून करण्यात येईल.

**८.७** अर्जामधील दाव्यानुसार विहित कागदपत्रे सादर न करणा-या उमेदवारांची अथवा शारीरिक क्षमता चाचणीमध्ये पात्र न ठरलेल्या उमेदवारांची शिफारस त्वरीत रद्द करण्यात येईल. तसेच कागदपत्रे सादर न करणा-या उमेदवारांना कागदपत्रे सादर करण्यासाठी कोणतीही मुदतवाढ देण्यात येणार नाही.

**८.८** अर्जातील दाव्यानुसार पात्रता आढळून न आल्यास अथवा अर्जातील दाव्यानुसार कागदपत्रांची पुर्तता न केल्यास, अर्ज करताना आयोगास खोटी माहिती सादर केली असे समजून संबंधित उमेदवाराची उमेदवारी रद्द करण्यात येईल. तसेच, आयोगाच्या स्वेच्छाधिकारानुसार आयोगामार्फत आयोजित सर्व परीक्षा / निवडीकरीता कायस्वरुपी प्रतिरोधीत (Debar) करण्यासह संबंधित कायद्यातील तरतुदीनुसार इतरही कारवाई करण्यात येईल.

**९. सेवाप्रवेशोत्तर शर्ती:-**

**९.१** वर नमूद केल्याप्रमाणे परिविक्षा कालावधीत नमूद अनुभव व अनुज्ञप्तीच्या अटींची पूर्तता करेपर्यंत सदर उमेदवारास सहायक मोटार वाहन निरीक्षक पदाची कोणतीही कर्तव्य अथवा जबाबदा-या पार पाडता येणार नाही.

**९.२** नियुक्त केलेली व्यक्ती दोन वर्षाच्या कालावधीकरीता परिविक्षाधीन असेल, परिविक्षाधीन कालावधी जास्तीत जास्त एका वर्षापर्यंत वाढविता येईल.

**९.३** परिविक्षाधीन कालावधीमध्ये विहित केलेली विभागीय परीक्षा उत्तीर्ण होणे आणि विहित केलेले प्रशिक्षण कोणतेही असल्यास पूर्ण करणे आणि परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण करणे आवश्यक असेल, जर विहित केलेली विभागीय परीक्षा किंवा प्रशिक्षण किंवा परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केला नाही तर ती व्यक्ती सेवा समाप्त करण्यास पात्र राहील.

**९.४** परिविक्षाधीन कालावधी यशस्वीरित्या पूर्ण केल्यानंतर किमान पाच वर्ष कालावधीसाठी मोटार वाहन विभागात सेवा करण्याचे बंधपत्र सादर करणे आवश्यक राहील.

**९.५** हिंदी आणि मराठी भाषा परीक्षेसंबंधी केलेल्या नियमानुसार जर ती व्यक्ती अगोदर परीक्षा उत्तीर्ण झाली नसेल किंवा तिला उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळाली नसेल तर ती परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील.

**९.६** महाराष्ट्र शासनाच्या माहिती तंत्रज्ञान संचालनालयाने वेळोवेळी विहित करण्यात आलेले संगणक हाताळणी विषयक प्रमाणपत्र धारण करावे लागेल.

**९.७** सदर पदावर नियुक्त केलेली व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदली होण्यास पात्र राहील.

**१०. प्रस्तुत परीक्षा योजना उमेदवारांना परीक्षेचे स्वरुप समजण्यास सुलभता व्हावी, या हेतूने प्रसिध्द करण्यात येत असून यामधील कोणतीही तरतूद प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावली यांमधील तरतूदींशी विसंगत असल्यास प्रस्तुत परीक्षेची जाहिरात / अधिसूचना, संबंधित शासन निर्णय व आयोगाच्या कार्यनियमावलीतील तरतुदी ग्राह्य धरण्यात येतील.**

************

दिनांक:-२५ फेब्रुवारी, २०२०

उप सचिव, परीक्षा पूर्व
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.